थोडक्यात

नेकनूर मध्ये जिओच्या सर्विसेस डाऊन नेटकरांचा सोशल मीडियावर तक्रारींचा पाऊस

जिओ कंपनीचे कार्ड पोर्टेबल करून दुसऱ्या कंपनीकडे नेकनूर मधील ग्राहक जाण्याचा कल

नेकनूर । प्रतिनिधी

जिओ ही दूरसंचार क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी आहे. देशभरात या कंपनीच्या सेवांचा अपयोग करणाऱ्या कोट्यवधी नागरिक आहेत. मात्र सध्या नेकनूर मधील जिओ नेटवर्कची सेवा डाऊन झाल्याची तक्रार वापरकर्त्यांनी सोशल मीडिया मार्फत केली आहे. जिओ नेटवर्क डाऊन झाल्यानं अनेकांना इंटरनेट उपलब्ध होत नाही. व्हाटसप ,इन्स्टाग्राम, यूट्यूब , फेसबुक,वापरण्यात अनेकांना अडचणी निर्माण झाल्या. त्यामुळे जिओच्या सर्व्हिसेस वापरणाऱ्यांनी याबाबत नाराजी व्यक्त केली आहे. जिओ नेटवर्कच्या काही वापरकर्त्यांनी जिओ कस्टमर केअर आमच्या तक्रारींना प्रतिसाद देत नाहीये, अशी तक्रार केली आहे. याबाबत वापरकर्त्यांनी सोशल मीडियावर संताप व्यक्त केला आहे. यातीलच एका नेटकऱ्याने इटरनेचा स्पीड फारच कमी झाला आहे. याबाबत मी जिओच्या कस्टमर केअरकडे तक्रार केली. पण त्यांनी थेट माझा कॉल डिस्कनेक्ट केला, अशा भावना व्यक्त केल्या. जिओची सर्व्हिस डाऊन झाल्यानंतर समाजमाध्यमांवर अनेक मीम्सचा पाऊस पाडला. दरम्यान, जिओने याबाबत अद्याप कोणतेही अधिकृत भाष्य केलेल नाही. मात्र नेटकऱ्यांनी याबद्दल संताप व्यक्त केला आहे. गुगल, व्हाट्सअप, फेसबुक, युट्युब, याशिवाय इतर सोशल मीडिया वापरण्यात अडचणी निर्माण झाल्याबद्दल नेटकऱ्यांनी संताप व्यक्त केला. जिओ कंपनी मधून कार्ड पोर्टेबल करून दुसऱ्या नेटवर्क कंपनीकडे नेकनूर मधील ग्राहकांचा जाण्याचा कल दिसून येत आहे.

होम मिनिस्टरला महिलांचा वाढता प्रतिसाद

▸ मातोश्रीवर देखील महिला भगिनींची अलोट गर्दी

बीड । प्रतिनिधी

माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या चार दिवसापासून सुरू झालेल्या होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी या कार्यक्रमाला पहिल्या दिवसापासूनच महिलांचा प्रचंड प्रतिसाद मिळू लागला आहे आजही चौथ्या दिवशी शहरातील मातोश्री मंगल कार्यालयात महिलांनी अलोट गर्दी केली होती

माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून काकू-नाना प्रतिष्ठान आयोजित होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी २०२४ खेळ पैठणीचा हा कार्यक्रम बीडच्या मातोश्री मंगल कार्यालय पेठ बीड प्रभाग क्रमांक चार या भागातील महिलांचा मोठा प्रतिसाद मिळाला, या स्पर्धे चे उद्घाटन सौ.रूपालीताई सतीश पवार यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी महिला आघाडीच्या अध्यक्ष सौ.जयश्रीताई विधाते सौ. राखी राणा चव्हाण सौ. प्रेमलताताई चांदणे, सौ. मनीषाताई क्षीरसागर, डॉ . सुप्रियाताई क्षीरसागर सौ. गंगासागर गोरे, सौ. राजकन्याताई पवार

सौ. वर्षाताई लोळगे, डॉ अबोलीताई मसुरे- पांगारकर अंजलीताई पवार सौ. भारतीताई राजेश क्षीरसागर,सौ. कीर्तीताई पांगारकर, सौ. अर्चनाताई पांगारकर प्रमुख महिलांच्या उपस्थितीत व श्री बंडू निसर्गंध , श्री सतपाल लाहोट, डॉ प्रमोद पवार, श्री राजेश क्षीरसागर या प्रमुख कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत या स्पर्धेचे उद्घाटन झाले. होम मिनिस्टर स्पर्धे ला महिलांनी पाण्या पावसाची तमान बाळगता व्यस्त संसारातून आपल्या आनंदासाठी , मन रिजविण्यासाठी या स्पर्धेला उस्फूर्त सहभाग नोंदविला.

होम मिनिस्टर संपावती सम्राज्ञी २०२४ खेळ पैठणीचा ही स्पर्धा प्रसिद्ध निवेदक सुरेश साळुंखे यांच्या बहारदार व विनोदी शैलीने पार पडली . या स्पर्धेचा अंतिम निकाल प्रथम पैठणी विजेती महिला सौ. मनीषा पवन सपकाळ या ठरल्या ,द्वितीय बक्षीस इमिटेशन ज्वेलरीच्या मानकरी सौ. रेणुका नंदन पवार तृतीय बक्षीसच्या मानकरी सौ. गौरी अजय क्षीरसागर या ठरल्या तर उर्वरित सात महिलांना आकर्षक गिफ्ट हॅम्पर देण्यात आले. यामध्ये सौ. रेखा महादेव काळे अश्विनी नाथा सत्वधर,सौ. अबोली सुनील मसुरे सौ. राणी अजय जाधव सौ. जयश्री सुनील निर्मळ या महिला

७ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या अंतिम फेरी करिता या सर्व म हिलांची निवड झाली. मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिसरातील कार्यकर्ते पदाधिकारी, नगरसेवक व नागरिक यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास महिला भगिनी हजारोच्या संख्येने उपस्थित होत्या.

नाशिक जिल्ह्यासाठी यलो आणि रेड अलर्ट, मुंबई वेधशाळेचा इशारा

नाशिक । प्रतिनिधी

राज्यात बहुतांश जिल्ह्यात पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. त्यानुसार नाशिक जिल्ह्यातही येलो अलर्टसह रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. येत्या २४ डिसेंबरपासून ते २६ सप्टेंबरपर्यंत जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

याबाबत मुंबई वेधशाळेने पावसाचा इशारा दिला आहे.

मुंबई वेधशाळेने वर्तविलेल्या हवामान अंदाजानुसार नाशिक जिल्ह्यात काही ठिकाणी (येलो अलर्ट) दि. २३ सप्टेंबर २०२४ रोजी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट, हलका ते मध्यम पाऊस आणि सोसाट्याचा वारा (३०-४० किमी प्रति तास) वेगाने वाहण्याची शक्यता आहे. नाशिक जिल्ह्यात काही ठिकाणी (येलो अलर्ट) दि. २४ व २५ सप्टेंबर २०२४ रोजी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट, जोरदार पाऊस आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे. तसेच दि. २४ व २५ सप्टेंबर २०२४ रेड अलर्ट घोषित करण्यात आला आहे. या दोन दिवस मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट, जोरदार ते अति जोरदार पाऊस आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे. २३ सप्टेंबर : नाशिक जिल्ह्याच्या काही ठिकाणी (येलो अलर्ट)

गोदापत्रात स्थानिक गुन्हे शाखेची छापेमारी १५ लाखाचा मुद्देमाल जप्त

बीड । प्रतिनिधी

बीड पोलीस अधीक्षक पदी अविनाश बारगळे यांनी पदभार घेतल्यापासून अवैद्य धंदे करणाऱ्या, गुंड व्यक्ती, फरार आरोपीस कारवाई करण्याच्या सूचना दिल्याने दिनांक २१/०९ / २०२४ रोजी पोलीस निरीक्षक उस्मान शेख स्था.गु.शा.बीड यांना गुप्त बातमी मिळाली की, संगम जळगाव - हिंगणगाव येथील गोदा नदी पात्रात वाळू ट्रॅक्टर व केनीच्या सहायाने चोरटी उपसा चालु आहे.

त्यावरुन श्री. उस्मान शेख साहेब यांनी स्था. गु.शा. बीड चे पो.उप.नि. सिध्देश्वर मुरकूटे व पथकाला छापा मारण्याचे सुचना दिल्या. त्यावरुन पो.उप.नि. सिध्देश्वर मुरकूटे व त्यांचे सोबत गेलेल्या पथकाने संगमजळगाव -हिंगणगाव येथे शेतकर्याच्या वेषभुषेत पेहराव करुन गेले असता

तेथे नदी पात्रात ट्रॅक्टर व केनीच्या सहाय्याने वाळु चोरटी उपसा चालु असल्याचे दिसले. स्थागुशा पथकाने लागलीच पाठलाग करुन छापा टाकला असता छाप्यामध्ये ०३ ट्रॅक्टर व केनी ताब्यात घेतल्या व ट्रॅक्टर चालक व मालक यांचेवर गेवराई पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे. व तीन आरोपींना ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी पोलीस स्टेशनला हजर केले आहे. सदर कारवाईमध्ये एकुण १५ लाखचा मुद्देमाल तपासकामी जप्त केला आहे. सदरची कामगिरी मा. श्री. अविनाश बारगळ पोलीस अधीक्षक, बीड, मा. श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. उस्मान शेख स्था.गु.शा.बीड, पोउपनि सिध्देश्वर मुरकुटे, सफौ / जगताप पोह/ कैलास ठोंबरे, पोना / विकास वाघमारे, पोशि/ सुनील राठोड यांनी केली आहे.

सोसायटीच्या कामानिमित्त निघाले होते छ.संभाजीनगरला; वाटेत काळाने घाला घातला

▸ बर्दापूर जवळील भीषण अपघातातील चारही मृतांची ओळख पटली

अंबाजोगाई । प्रतिनिधी

रविवारी पहाटे अंबाजोगाई लातूर बर्दापूर पाटी जवळ स्विफ्ट कार आणि कंटेनरच्या भीषण अपघातात कारमधील चार प्रवाशांचा बळी गेला. या चारही मृतांची ओळख पटली असून ते सर्व लातूर जिल्ह्यातील रहिवासी आहेत.

लातूर जिल्ह्यातील जगळपूर येथील माधव व्यंकटराव खलंग्रे (वय ५८), आत्माराम माधवराव बाणापुरे (वय ५४), सौदागर

केशव कांबळे (वय ५०) हे सोसायटीच्या कामानिमित्त सचिव शिवराज शंकरराव डोम (वय ५, रा. व्यंकटेश नगर, लातूर) यांना सोबत घेऊन शनिवारी रात्री उशिरा छत्रपती संभाजीनगरला जाण्यासाठी स्विफ्ट कार मधून (एमएच २४ एएस ६३३४) निघाले होते. रात्री सुरु असलेल्या मुसळधार पावसात अंबाजोगाई लातूर रोडवरील बर्दापूर पाटी जवळ रविवारी पहाटे एक वाजताच्या सुमारास त्यांच्या कारची आणि समोरून येणाऱ्या कंटेनरची (एमएच १२ एमव्ही ७१८८) जोरदार धडक झाली. या भीषण अपघातात कारमधील चौघांचाही जागीच मृत्यू झाला. बर्दापूर पोलिसांनी तातडीने अपघातस्थळी भेट देऊन सर्व मृतदेह अंबाजोगाईच्या शासकीय रुग्णालयात हलविले. रविवारी दुपारपर्यंत मृतदेहांच्या शवविच्छेदनाची प्रक्रिया सुरु होती. बर्दापूर पोलीस पुढील तास करत आहेत.

जाहीर प्रगटन

मा. डी. एम. हिंग्लजकर दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, वडवणी यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १७७/२०२४

त्रिंबक / निरंक

अर्जदार- १)त्रिंबक पि. काशीनाथ कदम, वय ७७ वर्षे, धंदा शेती रा. वडवणी ता. वडवणी जि. बीड. २) रामभाउ पि. काशीनाथ कदम, मयत वारस- २/१ अन्नपूर्णा भ्र. रामभाउ कदम, वय ६८ वर्षे, धंदा शेती रा. वडवणी ता वडवणी जि. बीड.२/२ मंगल भ्र. प्रमेश्वर इके, वय ४० वर्षे, धंदा घरकाम रा तेलगाव ता धारूर जि बीड. २/३ विमल भ्र बाबासाहेब व्हांडे, वय ३७ वर्षे, धंदा घरकाम, रा वडवणी ता वडवणी जि बीड. २/४ संगीता भ्र. हनुमंत मायकर , वय ३४ वर्षे, धंदा घरकाम, रा वारदरी ता धारूर जि बीड. ३. आसाराम पि. काशीनाथ कदम मयत वारस- ३/१ चिंगूबाई भ. आसाराम कदम, वय ६० वर्षे धंदा घरकाम, रा वडवणी जि बीड. ३/२ हानुमंत पि. आसाराम कदम, वय ३५ वर्षे धंदा शेती, रा वडवणी जि बीड. ३/३ सुग्रीव पि. आसाराम कदम, वय २९ वर्षे, धंदा वकीली, रा वडवणी ता वडवणी जि बीड. ३/४ उषा भ्र दत्तात्रय सुरवसे, वय ४० वर्षे धंदा घरकाम रा देशमुखवाडी शिवणे गावठाण ता हवेली जि पुणे. ३/५ रत्नमाला भ्र. दत्तात्रय गिराम, वय ३८ वर्षे, धंदा घरकाम, रा नाथापूर ता जि बीड. ३/६ जयश्री भ्र. गंगाधर डाके, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम रा बाभळगाव ता माजलगाव जि बीड़. ४ महादेव पि काशीनाथ कदम, वय ७० वर्षे, धंदा शेती, रा वडवणी ता वडवणी जि बीड

गैरअर्जदार - निरंक

मागणी- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात **मयत काशीनाथ पि. माधव कदम रा वडवणी ता. वडवणी जि. बीड** यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी- **काशीनाथ पि. माधव कदम रा वडवणी ता वडवणी जि बीड** यांचा मृत्यु दि. २८/०८/२००६ रोजी वडवणी येथे मयत झाले असुन अर्जदार क, १ व ४ हे मुले असून अर्जदार क्र २/१ ही सुन आहे अर्जदार क्र. २/२ ते २/४ ह्या विवाहित नाती आहेत. अर्जदार क्र. ३/१ ही सुन आहे, अर्जदार क्र. ३/२ व ३/३ हे नातू व अर्जदार क्र ३/४ ते ३/६ या विवाहित नाती आहेत.

वरील अर्जदारांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबदद्ल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू जि बीड मयत- काशीनाथ पि माधव कदम रा वडवणी ता वडवणी जि. बीड यांचे वारसअसल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक १९ माहे ०९ सन २०२४ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले. **सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १५/१०/२०२४ आहे.**

शिक्का

आदेशावरून.
(स्वाक्षरीत)
सहा. अधीक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, वडवणी

(स्वाक्षरीत)
लिपीक

जाहीर प्रगटन

मा. डी. एम. हिंग्लजकर दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, वडवणी यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १७३/२०२४

चिंगूबाई / निरंक

अर्जदार - १) चिंगूबाई भ्र. आसाराम कदम, वय ६० वर्षे, धंदा घरकाम रा. वडवणी जि. बीड. २) हनुमंत पि. आसाराम कदम, वय ३५ वर्षे धंदा शेती रा वडवणी जि बीड. ३) सुग्रीव पि. आसाराम कदम, वय २९ वर्षे, धंदा वकीली, रा वडवणी वडवणी जि बीड. ४) उषा भ्र दत्तात्रय सुरवसे, वय ४० वर्षे धंदा घरकाम, रा देशमुखवाड़ी शिवणे गावठाण ता हवेली जि पुणे. ५) रत्नमाला भ्र. दत्तात्रय गिराम वय ३८ वर्षे धंदा घरकाम, रा नाथापूर ता. जि. बीड. ६)जयश्री भ्र. गंगाधर डाके, वय ३२ वर्षे, धंदा घरका, रा बाभळगाव ता माजलगाव जि बीड

गैरअर्जदार - निरंक

मागणी - वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत- आसाराम पि काशीनाथ कदम रा. वडवणी ता वडवणी जि बीड यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी - **आसाराम पि काशीनाथ कदम रा वडवणी ता वडवणी जि बीड** यांचा मृत्यु दि. ०५/०१/१९९९ रोजी वडवणी येथे मयत झाले असुन अर्जदार क्र. ०१ ही पत्नी व अर्जदार क्र २ व ३ ही मुले असुन अर्जदार क्र ४ ते ६ हया विवाहीत मुली आहेत.

वरील अर्जदारांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार जि बीड यांचे वारस हयांचे हक्काबदद्ल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहु **मयत- आसाराम पि काशीनाथ कदम रा वडवणी ता वडवणी जि बीड** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १९ माहे ०९ सन २०२४ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १५/१०/२०२४ आहे.

शिक्का

आदेशावरून.
(स्वाक्षरीत)
सहा. अधीक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, वडवणी

(स्वाक्षरीत)
लिपीक

जाहीर प्रगटन

मा.श्री आर. जी. बागडे साहेब, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज १३३०/२०२४

सय्यद रफिक नि निरंक

ॲड संजोत महाजन यांच्या मार्फत

अर्जदार- १) सय्यद रफिक सय्यद इसाकोद्दीन, पत्ता बालेपिर, ता. जि. बीड. २) सय्यद युसूफ सय्यद इसाकोद्दीन, रा. बालेपिर, ता. जि. बीड ह.मु. संजयनगर गेवराई, ता. गेवराई जि.बीड. ३) अखिला बेगम शेख गफ्फार पटेल, रा. नुर कॉलनी, इस्लामपुरा, नालेवडी रोड, गांधीनगर बीड, ता.जि. बीड ४) फर्जानाबेगम जब्बार शेख, रा. इस्लामपुरा, गेवराई ता. गेवराई जि.बीड. ५) शहाजा शौकत शेख, रा. नुर कॉलनी, इस्लामपुरा, नालेवडी रोड, गांधीनगर बीड, ता. जि. बीड. ६) सय्यद सलिमा बेगम सय्यद असिफ, रा. आजमेर नगर, बालेपिर बीड ता. जि. बीड. ७) रेहाना बेगम वहाब पठाण, रा. गुलमंडी रोड, औरंगाबाद, ता. जि. बीड ८) मोहमदी इलियास सय्यद, रा. हिरापुर ता. गेवराई जि.बीड. ९) नसिमबेगम नूर बेग, रा. अजमेर नगर, बालेपिर, बीड, ता.जि. बीड.

विरुध्द **निरंक**

मागणी - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात **मयत फाजला बेगम भ्र. मोहमद ईसाकोद्दीन** मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मि ळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी **मयत फाजला बेगम भ्र. मोहमद ईसाकोद्दीन यांचा मृत्यु दिनांक २६/०७/२०२१ रोजी** झाला आहे. वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. **मयत फाजला बेगम भ्र. मोहमद ईसाकोद्दीन** यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू **मयत फाजला बेगम भ्र. मोहमद ईसाकोद्दीन** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक २०/०९/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयायचे शिक्याने दिले. **सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २३/१०/२०२४ आहे.**

शिक्का

आदेशावरून.
(स्वाक्षरीत)
अधीक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर, बीड

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

श्री. आर.आर. जाधव ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गेवराई

गेवराई, जि.बीड यांचे न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज क. ७९५/२०२४

रंभाबाई व इतर ०६ वि. निरंक

(मार्फत -ॲड. एस. बी. भंडारी. गेवराई)

ज्याअर्थी मयत नामे **बापुसाहेब पि. वापुजी वायभट, रा. मौजे. सुखमसला, ता. गेवराई, जि. बीड हे दिनांक २१/१२/२०२२ रोजी मौजे लुखामसला, ता. गेवराई, जि. बीड** येथे मयत झाले.

अर्जदार :- १. रंभाबाई भ्र. बापूसाहेब वायभट, वय ७०, धंदा घरकाम, रा. लुखामसला, ता. गेवराई, जि. बीड. ०२.मंगल भ्र. बाळु सावंत, वय ४२, धंदा घरकाम, रा. तुळजाभवानी मंदीर. कर्णपुरा, घर नं. १५ छावणी, औरंगाबाद, ता.जि. औरंगाबाद, ०३. कल्पना भ्र. महादेव भोर्डे, वय ३४, धंदा मरकाम, रा. काजळा, ता. जि. जालना. ०४. आदिका भ्र. अशोक सावंत, वय ३०, धंदा घरकाम, रा. प्लॉट नं. ६७. गट नं. १८१, लक्ष्मी कॉलनी, सातारा परिसर, बीड बायपास रोड, औरंगाबाद, ना जि. औरंगाबाद, ०५. कविता भ्र. अशोक झापुडगे, वय २८. धंदा घरकाम. रा. तप्पटवाडी, ता. जि. बीड, ०६. मनीषा भ्र. ताराचंद शेंडगे, वय २७ धंदा घरकाम, रा मेन रोड, तिप्पटवाडी ता.जि. बीड.

ज्याअर्थी अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसांचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुण असेही कळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा व त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे बापुसाहेब पि. बापुजी वायभट, लुखामसला, ता. गेवराई, जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनाक १९/०९/२०२४ माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ०८/११/२०२४

शिक्का

आदेशावरून.
(स्वाक्षरीत)
सहा. अधीक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

जाहीर प्रगटन

तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं २०२/२०२४

नामदेव पि. रानूजी बहिर विरुद्ध

ग्रामपंचायत कार्यालय, राजुरी (नवगण)

पहा

१. नामदेव पि. रानुजी बहिर,

रा. विश्वकर्मा पोलीस सो. चऱ्हाटा फाटा, बीड.

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत संतु गोपाळा बहिर यांचा दिनांक १६/०४/१९६१ रोजी मृत्यू झालेला असुन त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यासं मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास राजुरी (नवगण) ता.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक म हिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन,त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे राजुरी (न) ता.जि.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २०/०९/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख २१/१० /२०२४ ही आहे.

शिक्का

आदेशावरून.
(स्वाक्षरीत)
तहसिलदार,
बीड.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसने कळवण्यात येते की ,खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही **नवनाथ दगडू गालफडे** यांची वाडीलोपार्जित मालकी व वाहिवाटीची आहे. याची ७/१२ दपतरी नवनाथ दगडू गालफडे यांचे नावाची नोंद आहे . सादर नवनाथ दगडू गालफडे यास एक मुलगा नामे रवींद्र नवनाथ गालफडेहे आहे. यांचा विवाह आमचे अशील नामे सुजाता रवींद्र गालफडे यांच्याशी झालेला असून त्यांना एक मुगलीधनश्री रवींद्र गालफडेव एक मुलगा नामेसमर्थरवींद्र गालफडे आहेत. परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही वाडीलोपार्जित मिळकत असल्याने याचे आमचे अशील व त्यांची मुले यांचा सादर मिळकती मध्ये वाडीलोपार्जित मालकी हक्क आहे.

आमचे अशील यांच्या आशे निदर्शनास आले आहे की, आम चे अशील यांची कोणतीही परवानगी न घेता सादर मिळकतीचे ७/१२ दपतरी असलेल्या नावाचा गैरफायदा घेऊन सादर मिळकत विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत.

आमचे अशील यांची सादर मिळकत विक्रीस कोणतीही परवानगी नाही. कोणीही त्रयस्त इसमाने सादर मिळक खरेदी करू नये. सादर मिळकत आमचे अशील यांचे परवानगी शिवाय खरेदी केल्यास सादर खरेदी दस्त हा आमचे आशील यांचे हिस्स्यावरबंधनकारक राहणार नाही.

कोणाही त्रयस्त इसमाची फसवणूक होऊ नये म्हणून सादर जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे.

परिशिष्ट

तुकडी बीड ,पोट तुकडी ता बीड मे. दुय्यम निबंधक बीड यांचे अधिकार कक्षेतील गाव मौजे बाळापुर येथील गट नं.४६७ यासी क्षेत्र ०० हेक्टर ७७.५० आर यासी आकार १.५६ पैसे

दिनांक १९/०९/२०२४

ठिकाण: बीड

प्रगटन देणार
(स्वाक्षरीत)
ॲड. सुजाता शामसुंदर मोराळे

जनसामान्यांचे शस्त्र, दैनिक

मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

● जिल्हा विशेष ● सोमवार, दि.२३ सप्टेंबर २०२४ ● पान ४

शिवसंग्राम च्या वतीने नवरात्र काळात "जागर मातृ शक्तीचा" अभियान

अभियानांतर्गत डॉ.ज्योती मेटे यांच्या वतीने लोकप्रिय होम मिनिस्टर या भव्य कार्यक्रमाचे आयोजन

सिनेअभिनेता क्रांती नाना माळेगावकर आणि टीव्ही स्टार सह्याद्री माळेगावकर यांची असणार उपस्थिती

बीड । प्रतिनिधी

शिवसंग्रामच्या वतीने दी.२ ऑक्टोबर रोजी सुरू होणाऱ्या नवरात्र उत्सवात जागर मातृ शक्तीचा हे अभियान राबवण्यात येणार आहे. यानिमित्त नवरात्र काळात संबंध महाराष्ट्रत महिलांमध्ये प्रचंड लोकप्रिय असणारा होम मिनिस्टर (खेळ रंगला पैठणीचा) सिने अभिनेता क्रांती नाना माळेगावकर आणि टीव्ही स्टार सह्याद्री माळेगावकर यांचा भव्य कार्यक्रम दि. ०७ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वा. आशीर्वाद मंगल कार्यालय, बार्शी रोड, बीड येथे शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी आयोजन केले आहे.

लवकरच आदिशक्तीच्या नवरात्र उत्सवास प्रारंभ होणार आहे. या नवरात्रीमध्ये मातृ शक्तीचा जागर आपण नऊ दिवस आदीमायेच्या नऊ रूपांना पूजन करणार आहोत. आदिशक्तीचे स्वरूप असलेल्या महिला घर सांभाळतात, घरातल्यांनाही सांभाळतात घरखर्चही भागवतात आणि घराला सावरायचंही काम करतात. पण एवढं सारं करून सवरून विश्रांती, विरंगुळ्यापासून त्या वंचित राहतात. त्यांना ही कामातून थोडीशी विश्रांती मिळाली पाहिजे, त्यांच्या जिवाला थोडा विरंगुळा पाहिजेच यासाठीच या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमात पारंपरिक खेळांबरोबर यंदा महिलांना होम मिनिस्टर सारखे आधुनिक खेळही खेळायला मिळणार आहेत. जोडीला आणखीही बरेच स्पर्धात्मक उपक्रम आहेत. यात भाग घेणाऱ्या महिलांसाठी मोठ-मोठी बक्षिसं मिळणार आहेत. या कार्यक्रमासाठी वयाची अट नाही. यंदाचा नवरात्र उत्सव सहभागी महिलांना आयुष्यभर लक्षात राहावा अशा पद्धतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

थोडक्यात

गेवराई शहरात दिवसभर रिपरिप

गेवराई । प्रतिनिधी

शहरात रविवारी (दि.२२) दिवसभर पावसाची रिपरिप सुरू होती. दुपारपासूनच असलेल्या पावसाने शहरवासीय गारठले आहेत. शहरात सुरू असलेल्या पावसाने नद्यांच्या पाण्याच्या पातळीत वाढ होत आहे. दिवसभर झालेल्या पावसाने सर्वत्र पाणीच पाणी झाले होते. कामानिमित्त बाहेर पडणार्या नागरिकांना ओलेचिंब करून टाकले. त्यामुळे शहरातून जाणाऱ्या नद्यांची पाणीपातळी वाढली आहे. शहरात पावसाचा जोर वाढला आहे. अनेक ठिकाणी सखल भागांमध्ये पाणी साचल्यामुळे पायी चालताना कसरत होत होती. कामानिमित्त बाहेर पडलेले नागरिक छत्री व रेनकोट असूनही पावसाने हैराण झाले होते. पावसामुळे रस्त्यावरील भाजी विक्रेते, टपरी व्यावसायिकांचे हाल झाले. सामानाची आवराआवर करताना त्यांची तारांबळ उडत होती. नेहमी शास्त्री चौक येथे गजबजलेल्या बाजारपेठेतदेखील पावसामुळे नागरिकांची वर्दळ कमी झाली होती. बसस्थानकावर बसची प्रतीक्षा करणार्या नागरिकांना बसशेड गळत असल्यामुळे अपुरे पडत होते. काही ठिकाणी बसथांब्याजवळ पाणी साचल्याने प्रवाशांना उभे रहायला जागा नव्हती.

वडापाव चा व्यवसाय सुरू करायचंय तर परीक्षा देण्यास तयार रहा

बीड । प्रतिनिधी

सुशिक्षित बेरोजगारांना आता आपली बेरोजगारी दूर करण्यासाठी जर वडापाव विक्रीचा व्यवसाय सुरू करायचा असेल तर त्यांना यासाठी प्रशिक्षण घेऊन परीक्षा द्यावी लागणार आहे. परीक्षेत उत्तीर्ण होऊन प्रमाणपत्र घेतल्यानंतरच वडापाव विक्रीचा व्यवसाय करण्यास परवानगी मिळणार आहे अन्यथा नाही. तेव्हा आता सुशिक्षित बेरोजगारांना वडापावचा व्यवसाय सुरू करायचा असल्यास प्रशिक्षण आणि परीक्षा देऊन उत्तीर्ण होण्यास तयार राहावे लागणार आहे. केंद्र सरकारच्या भारतीय अन्नसुरक्षा आणि मानके प्राधिकरणच्या माध्यमातून राज्यात प्रत्येक जिल्ह्यात विविध खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्यांना प्रशिक्षण देऊन त्यांची परीक्षा घेतली जात आहे. त्यामुळे बीड शहरासह इतर तालुक्यांतील रस्त्यालगत असणाऱ्या वडापाव, पावभाजी यासह इतर खाद्यपदार्थ विक्रेत्यांना प्रशिक्षण पूर्ण करून प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे लागणार आहे. ५० गुणांची परीक्षा द्यावी लागणार आहे. ही परीक्षा उत्तीर्ण होणे गरजेचे आहे. एफओएसटीएसी प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रत्येक फूड बिझनेस ऑपरेटरकडे प्रशिक्षित अन्न सुरक्षा पर्यवेक्षक असणे अनिवार्य आहे. केंद्र सरकारच्या भारतीय अन्नसुरक्षा आणि मानके प्राधिकरणाच्या माध्यमातून ही मोहीम राबविण्यात येत आहे. त्यासाठी प्राधिकरणाने खाद्यपदार्थ तयार करणे व हाताळणी करणाऱ्यांना प्रशिक्षण देणे सुरू केले आहे. यासंदर्भात राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये हॉटेलमालक, खाद्यपदार्थ विक्रेत्यांची कार्यशाळा घेतली जात आहे. कार्यशाळेनंतर उपस्थित प्रतिनिधींची त्याच ठिकाणी परीक्षा घेतली जाते किंवा एखादा दिवस निश्चित केला जातो. अनुत्तीर्ण झालेल्यांसाठी पुन्हा परीक्षा देण्यासाठी दिवस निश्चित केला जातो. बीड जिल्ह्यात अन्न विभागातर्फे कार्यशाळा घेऊन हॉटेल विक्रेते, खाद्य पदार्थ विक्रेत्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रशिक्षणात त्यांना अन्नपदार्थ हाताळणे, स्टोअर करणे, नाशवंत पदार्थ साठवणूक करणे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले जाईल. कार्यशाळेनंतर संबंधितांना प्रमाणपत्र वाटप केले जाते. जिल्ह्यात आतापर्यंत परीक्षा घेतलेली नाही, लवकरच ही परीक्षा घेतली जाणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

सिंचनासाठी हक्काच्या मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेचा शेतकरी बांधवानी लाभ घ्यावा : ॲड. शंकर चव्हाण

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील तमाम शेतकरी बांधवांनी शेतामध्ये सिंचनासाठी हक्काच्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या वतीने सुरु असलेली मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन ॲड. शंकर चव्हाण यांनी केले आहे. तसेच सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी ऑनलाईन प्रणालीमार्फत अर्ज सादर करुन लाभा घ्यावा असेही ड. शंकर चव्हाण यांनी सर्व शेतकरी बांधवाना प्रसिध्दीपत्राकाच्या माध्यमातून आवाहन केले आहे. सदर योजनेसाठी लागणारे निकष हे महावितरण कंपनीने निश्चित केलेले असून, ५ एकरपर्यंत शेतजमीनधारक असणाऱ्या शेतकऱ्यांस ३ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतचा सौर कृषी पंप, २.५१ ते ५ एकर पर्यंतच्या शेतकऱ्यांस ५ अश्वशक्ती क्षमतेचा आणि एकरवरील शेतजमीनधारक शेतकऱ्यांस ७.५ अश्वशक्तीची क्षमता असलेला सौर कृषी पंप दिला जाईल. या योजनेची माहिती https://mahadiscom.in/solar या संकेतस्थळावरीही सविस्तर दिली गेली आहे.

मराठा समाजाच्या आरक्षणाला धनगर समाजाचा जाहीर पाठिंबा: मोहन देवकते

वडवणी । प्रतिनिधी

अंतरवाली सराटी या ठिकाणी चालू असलेले उपोषण आणि त्यामध्ये चालू असलेले वाद यामध्ये आमचा धनगर समाज कदापी पडणार नाही. मूळतः आमची धनगर समाजाची जी मागणी आहे ती ST (अनुसूचित जाती) मध्ये असलेल्या आरक्षणाची आहे. त्यामुळे मराठा समाज नेहमी धनगर समाजाच्या आरक्षणाच्या बाजूने आहे. त्याच प्रकारे धनगर समाज सुद्धा मराठा समाजाच्या आरक्षणाला विरोध करत नाही. त्यामुळे मराठा समाजाची वेगळी मागणी आहे, आणि आमची धनगर समाजाची वेगळी मागणी एसटी आरक्षण संदर्भात, त्यामुळे मराठा समाजाच्या आरक्षणाला धनगर समाजाचा फुल पाठिंबा आहे. असं प्रसिद्धी पत्रकाद्वारे आनंदवाडी चे विद्यमान सरपंच मोहन देवकते यांनी सांगितले आहे,

परतीच्या पावसाने सोयाबीन पिकाचे नुकसान नेकनूर मंडळातील शेतकरी चिंतेत

नेकनूर । प्रतिनिधी

नेकनूर मंडळातील बहुतांश भागात रविवारी पहाटे जोरदार पाऊस झाला. त्यामुळे काढणीस आलेल्या सोयाबीन पिकांचे मोठे नुकसान झाले. परिणामी, शेतकरी चिंतेत आहेत.यंदा पेरणीनंतर पावसाने मोठा खंड दिला. त्यामुळे पिकांची उगवण क्षमता कमी झाली. त्यातून जे पीक वाचले त्याला नंतर अतिवृष्टीचा फटका बसला. या दोन्ही संकटातून थोडेफार पीक हाती आले होते. त्यातून काही प्रमाणात लागवड खर्च निघून नुकसान कमी होईल, अशी आशा होती.

▸ शेंगांना कोंब फुटण्याची भीती

सोयाबीनच्या शेंगा वाळल्या आहेत. काहींना मजुराअभावी सोयाबीन पीक काढता आले नाही. त्यामुळे शेतातच असलेल्या या वाळलेल्या सोयाबीन शेगांना या पावसामुळे कोंब फुटू शकतात. तसे झाले तर काहीच पीक हातात येणार नाही, शासनाने हेक्टरी ५० हजार रुपये मदत जाहीर करावी. – सुभाष रामभाऊ शिंदे, शेतकरी नेकनूर

पण, ऐन दिवाळीच्या तोंडावर परतीच्या पावसाचा पुन्हा एकदा या पिकांना मोठा फटका बसला आहे. ज्या शेतकऱ्यांनी सोयाबीन काढून त्याची गंजी शेतात लावून ठेवली होती त्या शेतकऱ्यांची सोयाबीन पिकाला झाकताना मोठी तारांबळ उडाली. अनेकांच्या पिकात पाणी साचल्याने आता सोयाबीन काढणीस अडथळा आला आहे. परिणामी, शेतकरी चिंतेत आहेत.

नेकनूर परिसरात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाल्याने कापूस, सोयाबीनसह भाजीपाला व फळबागेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. परिसरात रविवारी पहाटे च्या सुमारास वादळी वारा व मेघगर्जनेसह पावसास सुरुवात झाली.

शेतात सोयाबीनची काढणी सुरू असल्याने मोठी तारांबळ उडाली. विजेचा लखलखाट व मोठ्या प्रमाणात मेघगर्जनेसह पावसामुळे भीतीदायक वातावरण झाले होते. शेतातील काढून ठेवलेल्या सोयाबीनच्या गंज्यांमध्ये पाणी घुसले. वादळी वाऱ्यासह पाऊस झाल्याने कापूस पीकही लवंडले. भाजीपाला व फळबागेचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले. नेकनूर व परिसरात परतीच्या प्रवासात पावसाने हाहाकार केल्याने शेतीचे मोठे नुकसान झाले.

लोकशाही पत्रकार संघाच्या निवडी जाहीर

बीड । प्रतिनिधी

पत्रकारांचा बुलंद आवाज म्हणून ओळख असणाऱ्या लोकशाही पत्रकार संघाच्या महाराष्ट्र राज्य महिला व बाल कल्याण विकास समितीच्या प्रदेश अध्यक्षपदी सारिका यादव, प्रदेश उपाध्यक्ष प्रयोगशाळा तंत्रज्ञ् तथा सामाजिक कार्य विकास समिती डॉ. सुरेश पिंपळे, मराठवाडा अध्यक्ष इलेक्ट्रॉनिक मीडिया विकास समिती पदी नितेश उपाध्ये यांची निवड संघाचे संस्थापक अध्यक्ष बी.बी वैद्य, राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप जाधव, प्रदेश उपाध्यक्ष साजेद सय्यद, मराठवाड्याचे प्रदेश उपाध्यक्ष दत्तात्रय नरनाळे यांनी केली. त्यानंतर लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य , प्रदेश उपाध्यक्ष पोलीस मित्र विकास समिती राणी शेख, बीड जिल्ह्याचे अध्यक्ष

☛ (उर्वरित पान २ वर)

महाराष्ट्र राज्य महिला व बाल कल्याण विकास समितीच्या प्रदेश अध्यक्षपदी सारिका यादव, उद्योग विकास समितीच्या मराठवाडा अध्यक्षपदी अमोल घोडके , तर कायदेशीर विधी सल्लागार समिती मराठवाडा अध्यक्षपदी अँड श्रीकांत जाधव यांची नियुक्ती

रुई: मा.श्री.मनोज दादा जरांगे पाटिल यांच्या उपोषणाला समर्थन म्हणून रुई धानोरा गावच्या मुलींनी पाठिंबा दर्शवला पाठींबा

मांजरसुंबा येथील मोफत आरोग्य शिबिरात ९३२ रुग्णांची तपासणी

▸ रा.काँ.चे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांचा स्तुत्य उपक्रम

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील मांजरसुंबा येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून रविवारी (दि.२२) मोफत आरोग्य शिबीर पार पडले. या शिबिरात ९३२ रुग्णांची तपासणी करण्यात आली असून शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.योगेश क्षीरसागर होते. प्रमुख अतिथी म्हणून ह.भ.प.विष्णुदास महाराज सुरवसे, डॉ.सारिकाताई क्षीरसागर, माजी पंचायत समिती सभापती काकासाहेब जोगदंड, मांजरसुंबाचे सरपंच अरुण रसाळ, उपसरपंच शेख पप्पू, अच्युतराव रसाळ, मोहनराव रसाळ, बालासाहेब जाधव, आमेर सिद्दिकी, शुभम कातांगळे, संदीप इंगोले, संदीप कदम, बाबासाहेब खिल्लारे, महादेव खोसे, शंकर चव्हाण, शिवाजी येडे, रामकिसन कदम, समीर शेख, प्रकाश मांडवे, विष्णुपंत मेंगडे, शहाजी घोडके, राजाभाऊ क्षीरसागर, माजेद कुरेशी, मिलिंद ठोकळ, फुलचंद येडे आदींची उपस्थिती होती. या शिबिरात हृदयाची अन्जिओग्राफि, कॅन्सर शस्त्रक्रिया, अजिओप्लास्टी, मुत्रमार्ग शस्त्रक्रिया, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, स्त्रियांचे आजार अशा १७ आजारावर निदान व मोफत उपचार केले जाणार आहेत. या आरोग्य शिबिरात पंचक्रोशीतील नागरिक व रुग्ण मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, डॉक्टर क्षीरसागर दाम्पत्याच्या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

• ३४५ जणांना चष्मे वाटप ; २१ जणांचे रक्तदान

मांजरसुंबासह पंचक्रोशीतील ९३२ रुग्णांची तपासणी करण्यात आली. यावेळी ३४५ जणांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले. तसेच, १७५ जणांची रक्त तपासणी मोफत केली. याच आरोग्य शिबिरात २१ जणांनी रक्तदान केले. आवश्यकतेनुसार सोयीसुविधायुक्त रुग्णालयांमध्ये शस्त्रक्रिया मोफत करून दिल्या जाणार आहेत.